जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2021
लोकमत

# विद्यापीठात वसंतराव नाईक यांची जयंती

कोल्हापूर : महाराष्ट्राच्या कृषिक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात गुरुवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2021
लोकमत

कोल्हापूर, शुक्रवार दि. २ जुलै २०२१



# उन्हाळी परीक्षांसाठी सोमवारपासून अर्ज करावे लागणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून मार्च-एप्रिलमधील (उन्हाळी सत्रातील) पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्याचे नियोजन सुरू झाले आहे. या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालये अथवा पदव्युत्तर अधिविभागांमध्ये ऑनलाईन अर्ज करायचे आहेत. त्याची मुदत सोमवार (५ जुलै) पासून सुरू होणार आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्रातील सर्व पदविका, प्रमाणपत्र आणि पदवी अभ्यासक्रम, बी. व्होक., अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, टेक्सटाईल, बी. टेक., विधी, एमबीए, आदी विविध अभ्यासक्रमांच्या ७३८ परीक्षा होणार आहेत. त्यांचे स्वरूप ऑनलाईन एमसीक्यू असणार आहे. या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना सोमवार (दि.५) ते १४ जुलै दरम्यान विनाविलंब शुल्कामध्ये, विलंब शुल्कासह दि. १६ ते १९ जुलैपर्यंत, तर अतिविलंब शुल्कासह दि. २३ ते २६ जुलै या कालावधीत अर्ज करता येणार आहेत. याबाबतची अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या परीक्षांचे वेळापत्रक तयार करण्याचे काम सुरू असून लवकर ते जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी गुरुवारी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2021

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी परीक्षांसाठी सोमवारपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रिया

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२१ उन्हाळी परीक्षांतर्गत महाविद्यालय व पदव्युतर विभागामध्ये सोमवार, दि. ५ जुलैपासून प्रचलित पद्धतीनुसार ऑनलाईन परीक्षा अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे.

परीक्षा विभागाच्या वतीने परीक्षेसाठी अर्ज करण्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा सर्टिफिकेट, बी.व्होक, वायसीएसआरडीकडील अभ्यासक्रम तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्स्टाईल, बी.टेक, विधी, एमबीए या अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी ५ ते १४ जुलै या कालावधीत नियमित शुल्कासह ऑनलाईन अर्ज करता



येणार आहे. अतिविलंब शुल्कासह २६ जुलैपर्यंत अर्जाची मुदत आहे.

महाविद्यालये, विद्यार्थ्यांना शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरता येणार आहे. अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार संबंधित विद्यार्थ्यांची महाविद्यालयांनी पात्रता पूर्ण करून अर्ज भरून घ्यावेत. सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने विद्यार्थ्यांनी मोबाईल नंबर व ई-मेल आयडी महाविद्यालयात अपडेट करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2021
पुढारी

# विद्यापीठात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** महाराष्ट्राच्या कृषिक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2021
सकाळ

# विद्यापीठ परीक्षांसाठी ५ जुलैपासून अर्ज

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या मार्च-एप्रिल २०२१ मधील उन्हाळी सत्राच्या परीक्षेसाठी अर्ज भरण्यास ५ जुलैपासून सुरवात केली जात आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा, सर्टिफिकेट, वायसीएसआरडीचे अभ्यासक्रम, अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, टेक्स्टाईल, बी. टेक, विधी, एमबीएच्या परीक्षांकरिता अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर झाल्या आहेत.

५ ते १४ जुलैपर्यंत विनाविलंब, १६ ते १९ जुलैपर्यंत विलंब शुल्क तर २३ ते २६ जुलै दरम्यान विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2021
तरुण भारत

# उन्हाळी परीक्षांचे अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२१ उन्हाळी परीक्षांचे अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झाल्या आहेत. तरी विद्यार्थ्यांना नियमित्त शुल्कासह अर्ज भरावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी परिपत्रकाव्दारे केले आहे.

पदवी व पदव्युत्तर मार्च-एप्रिल २०२१ परीक्षांच्या वेळापत्रकासह परीक्षा अर्ज शुल्कही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झाले आहे. शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरून ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत. अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा अर्ज भरण्यापुर्वी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर पात्रता पूर्ण केलेली नाही. त्यांचे अर्ज ओपन होणार नाहीत. पात्रता पर्ण करून अर्ज भरून घ्यावयाचे आहेत. विद्यापीठ संलग्नीत विषयांचेच अर्ज विद्यार्थ्यांनी भरावयाचे आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा सर्टीफिकेट, बी.



होक., एम. बी. ए. यासह सर्व परीक्षांचे अर्ज वेळेत भरावेत. विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह ५ ते १४ जुलैपर्यंत अर्ज भरावयाचे आहेत. विलंब शुल्कासह १६ ते १९ जुलैपर्यंत अर्ज भरावयाचे आहेत. तर अतिविलंब शुल्कासह २३ ते २६ जुलैपर्यंत अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे नियमित शुल्कासह १७ जुलैपर्यंत, विलंब शुल्कासह २३ जुलै तर अतिविलंब शुल्कासह २८ जुलैपर्यंत अर्ज सादर करावेत. पदव्युत्तर अधिविभागांनी नियमित शुल्कासह १५ जुलै, विलंब शुल्कासह २२ जुलै तर अतिविलंब शुल्कासह २७ जुलैपर्यंत अर्ज सादर करावयाचे आहेत. तरी विद्यार्थी, महाविद्यालय व अधिविभागांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे.